MHKO100012952025

**नियमीत दिवाणी दावा क्र. १८६/२०२५**

लक्ष्मीबाई पोवार
विरुध्द
शेवंता पोवार

**निशाणी क्र. १३ वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जास त्याच अर्जावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावेत कलम १ मध्ये दावा मिळकत १अ व १ब नमूद केले आहे. दावा मिळकतीची ७/१२ उतारे दावेसोबत हजर केलेले आहेत. गट नंबर २४४ च्या ७/१२ पत्रकी क्षेत्र "० हेक्टर ४३" नमूद असताना दावा अर्जी कलम १ मध्ये दावा मिळकत १ब चे क्षेत्र नजर चुकीने व टायपिंग दोषाने "१ हेक्टर ४३ आर" असे नमूद झाले आहे. त्या ठिकाणी "० हेक्टर ४३ आर" असे क्षेत्र नमूद करणे गरजेचे आहे. सदरची दुरूस्ती ही तांत्रीक स्वरूपाची असून नजर चुकीने व टायपिंग दोषामुळे करणे भाग पडत आहे. सबब, वादी यांनी अर्जात नमुद प्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली व अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर आपले म्हणणे दिले व अर्जातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी यांनी असे कथन केले की, प्रस्तुत कामी वादी यांनी जाणुनबुजून चुकीचे कथन दाव्यात नमुद केले आहे. प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करण्याची विनंती त्यांनी केली.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा कायम मनाईकरिता व वाटपासाठी दाखल केला आहे. सदर दुरुस्ती तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरूस्तीमुळे दावेवर परिणाम होणार नाही. वादी व प्रतिवादी यांचेतील वाद अंतिमरित्या निर्गत होणेसाठी व दावेची पुनरावृत्ती टाळणेसाठी सदर दुरूस्ती गरजेची आहे.

०५. प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल

होणार नाही. याऊलट, वादीस सदर प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी न दिल्यास दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे राहणार आहे. सदर दुरुस्ती केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याऊलट, दावा हा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. वादी यांनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर करावा्यात.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.03.24 15:21:00 +0530

डी. एम. पवार
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २३/०३/२०२६.